## पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय
## हिंजवडी पोलीस स्टेशन प्रेसनोट दि.२१/०३/२०२२

**हिंजवडी पोलीस स्टेशन हाद्दीतील इन्फोसिस लि. फेज-१ हिंजवडी पुणे येथे मा.श्री विनय कुमार चौबे सो.पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांचे अध्यक्षतेखाली हिंजवडी इंडस्ट्रियल असोसिएशन मेंबर, पी.एम.आर.डी.ए. अधिकारी, पुणे मेट्रो, पी.सी.एम.सी, एन.एच.ए.आय एम.आय.डी.सी. अधिकारी, ग्रामपंचायत सरपंच, यांचे उपस्थितीत मिटींग घेण्यात आली.**

---

दि.२१/०३/२०२३ रोजी सकाळी ११/०० वा.ते १३.०० वा.दरम्यान हिंजवडी पोलीस ठाणे हाद्दीतील इन्फोसिस लि. फेज-१, हिंजवडी पुणे. येथे मा.श्री. विनय कुमार चौबे सो. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांचे अध्यक्षतेखाली मिटींग घेण्यात आली. सदर मिटींग मध्ये हिंजवडी-माण येथील राजीव गांधी इन्फोटेक पार्कच्या समस्येंशी संबंधीत विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. सदर मिटींग मध्ये हिंजवडी इंडस्ट्रियल असोसिएशन तर्फे श्री.चरणजितसिंह बोगल(रिटा.कर्नल) व श्री.गायकवाड (सिक्युरिटी हेड) यांनी आयटी सेक्टर मधील विविध प्रश्नांशी संबंधीत विषयसंबंधाने प्रेझेंटेशन सादर केले. त्यानंतर वाहतुक शाखेतर्फे हिंजवडी आय.टी परिसरातील वाहतुकीची समस्या व त्यावरील उपाययोजना याबाबत श्री.विठ्ठल कुबडे, पोलीस निरीक्षक हिंजवडी वाहतुक विभाग, यांनी प्रेझेंटशन सादर केले. श्री.अरविंद पवार, पोलीस निरीक्षक, औद्योगिक तक्रार निवारण कक्ष खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा पिं.चिं. यांनी प्रझेंन्टेशन देऊन माथाडी संदर्भातील किंवा औद्योगिक क्षेत्राशी संबंधीत काही तक्रारी असल्यास व्हॉट्सॲप क्रमांक- ९५२९६९१९६६ तसेच ईमेल piaec.pcpc-mh@mahapolice.gov.in यावर कळविणेबाबत अवाहन केले व सर्व कंपनी प्रतिनीधींना सुचनापत्रांचे वाटप केले. बैठकीदरम्यान मा.पोलीस आयुक्त सो. यांनी आपले मार्गदर्शनपर भाषणामध्ये एच.आय.ए., पी.एम.आर.डी.ए, पी.सी.एम.सी., एम.आय.डी.सी, इतर सर्व विभाग व पोलीस खाते असे सर्वांनी सहकार्याने व समन्वयाने काम करून हिंजवडी आयटी पार्क व इंडस्ट्रीजचे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीकोनातून आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतील असे आश्वासन दिले. तसेच कंपनीचे समोर रजिस्टर माथाडी कामगारांचे बोर्ड लावण्यासंदर्भात सुचित करून, कोणी खंडणी/पैशाची मागणी करत असेल तर पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांचे व्हॉट्सअप क्रमांकावर व रिड्रेस ग्रिव्हन्स सेल चे ई-मेल वर माहिती कळवावी तसेच कंपनी एम्प्लॉयचे सुरक्षेसंबंधीत इतर काही तक्रारी असतील तर डायल-११२ वर कॉल करून पोलीस मदत मागणेबावत मार्गदर्शन करण्यात आले. सदर बैठकीस मा.श्री. काकासाहेब डोळे, पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-२ पिंपरी चिंचवड, श्री. डॉ.विवेक मुगळीकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, हिंजवडी पोलीस स्टेशन, श्री. सुनिल पिंजण, पोलीस निरीक्षक,वाकड वाहतुक विभाग, पोलीस निरीक्षक श्री.अरविंद पवार (खंडणी विरोधी पथक), श्री.विठ्ठल कुबडे, पोलिस निरीक्षक हिंजवडी वाहतुक विभाग, श्री.राजकुमार राजमाने, पोलीस निरीक्षक, बावधन वाहतुक विभाग, हिंजवडी इंडस्ट्रियल असोसिएशन चे अध्यक्ष श्री. के.सुब्रमन्यन व विविध आय.टी कंपन्यांचे प्रतिनीधी, पी.एम.आर.डी.ए. अधिकारी, पुणे मेट्रो, पी.सी.एम.सी, एन.एच.ए.आय, एम.आय.डी.सी. अधिकारी, ग्रामपंचायत सरपंच उपस्थित होते. सदर बैठकीमध्ये श्री. योगेश जोशी (रिटा.कर्नल) (विप्रो लि. सिक्युरिटी हेड) यांनी आभार प्रदर्शन केले.

(काकासाहेब डोळे)
पोलीसउप आयुक्त ,परि-२
पोलीस आयुक्तालय पिंपरी चिंचवड

Scanned with CamScanner